# धक्कादायक! 'घरकुल'च्या नावाखाली रेती माफियांचा कहर-बेफाम ट्रॅक्टरखाली युवक चिरडला; प्रशासन झोपेत?

लोकनेता न्यूज नेटवर्क

**चंद्रपूर । सिद्धेश्वर केंद्रे**



घरकुल'सारख्या लोकहिताच्या योजनेचा आडोसा घेऊन सुरू असलेल्या रेती तस्करीने आता थेट निष्पापांच्या जीवावर बेतण्यास सुरुवात केली आहे. भोयगाव–भारोसा घाट परिसरात अवैध रेती वाहतुकीचा उच्छाद इतका वाढला आहे की, विना नंबरप्लेटचे ट्रॅक्टर सुसाट धावत नागरिकांच्या जीवाशी खेळ करत आहेत. अशाच एका भीषण अपघातात बाखर्डी येथील ३८ वर्षीय श्रीकांत राजूरकर हे मृत्यूशी झुंज देत आहेत.

२७ मार्च रोजी सायंकाळी सुमारे ६:३० वाजता, निमणी येथे रेती उतरवून परतणाऱ्या एका भरधाव ट्रॅक्टरने श्रीकांत राजूरकर यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की ट्रॅक्टर थेट त्यांच्या अंगावरून गेला. या अपघातात त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून हात–पाय फ्रॅक्चर झाले आहेत. तीन दिवस मृत्यूशी झुंज दिल्यानंतर त्यांना शुद्ध आली असली तरी प्रकृती अद्याप चिंताजनक आहे.

विना नंबरप्लेट ट्रॅक्टरचा सुळसुळाट

या परिसरात रेती तस्करांकडून जाणीवपूर्वक विना नंबरप्लेट ट्रॅक्टर वापरले जात असल्याचे उघड झाले आहे, जेणेकरून अपघात किंवा कारवाईच्या वेळी ओळख पटू नये. या प्रकारामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

स्थानिक तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांच्या 'अर्थपूर्ण' दुर्लक्षामुळेच हा प्रकार बोकाळल्याची चर्चा जोर धरत आहे.

विना नंबरचे ट्रॅक्टर खुलेआम कसे धावतात?

ग्रीकल्चर पासिंग असलेले ट्रॅक्टर व्यावसायिक रेती वाहतुकीसाठी कसे वापरले जातात?

तहसील प्रशासन याकडे डोळेझाक का करत आहे?

हे प्रश्न आता नागरिक थेट प्रशासनाला विचारत आहेत.

अपघातानंतर संबंधित ट्रॅक्टर चालक फरार असून, अद्याप कोणतीही ठोस कारवाई झालेली नाही. एका कुटुंबाचा संसार उद्ध्वस्त होत असताना प्रशासन गप्प का? असा संतप्त सवाल बाखर्डी परिसरातून उपस्थित होत आहे. वेळेत कारवाई न झाल्यास जनआंदोलन उभारण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

'मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करा' – जोरदार मागणी

घरकुल योजनेच्या नावाखाली सुरू असलेल्या रेती तस्करीत मोठा भ्रष्टाचार होत असल्याचे यापूर्वीही समोर आले होते. मात्र महसूल विभागाने कोणतीही ठोस पावले उचलली नसल्यानेच हा गंभीर अपघात घडल्याचा आरोप नागरिक करत आहेत. संबंधित तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी आता जोर धरत आहे.

रेती वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरने दुचाकीला धडक दिल्याची माहिती आहे. युवक गंभीर जखमी असून नागपूर येथे उपचार सुरू आहेत. कुटुंबाकडून फिर्याद प्राप्त होताच योग्य ती कारवाई करण्यात येईल,

– शिवाजी कदम, ठाणेदार, गडचांदूर

'घरकुल'च्या नावाखाली सुरू असलेला हा काळाबाजार केवळ शासनाच्या योजनांची बदनामी करत नाही, तर सर्वसामान्यांच्या जीवाशीही खेळ करत आहे. आता तरी प्रशासन जागे होणार का, की आणखी एका बळीची वाट पाहणार?

## भालगाव येथे मच्छिंद्रनाथ अखंड हरिनाम सप्ताह भक्तिमय वातावरणात संपन्न



लोकनेता न्यूज नेटवर्क

**बाळासाहेब खेडकर । पाथर्डी**

भालगाव येथील श्री क्षेत्र मायंबा विठ्ठल–रुक्माई मच्छिंद्रनाथ संस्थान येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचा सांगता सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात पार पडला. सप्ताहा दरम्यान विविध धार्मिक कार्यक्रमांनी संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.

सांगता सोहळ्यावेळी भगवान गडाचे मठाधीपती डॉ. नामदेव शास्त्री सानप यांची प्रमुख उपस्थिती होती. संस्थानचे महंत नवनाथ महाराज शास्त्री , प्रताप काका ढाकणे व सौ. प्रभावती काकी ढाकणे, व भालगाव खरमाट वाडी, कासुळवाडी येथील भाविक भक्त उपस्थित होते. मान्यवरांनी सहकुटुंब उपस्थित राहून मच्छिंद्रनाथ महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी कीर्तन, भजन, पालखी सोहळा आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. भाविकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत सप्ताह यशस्वी केला. ग्रामस्थांनी शिस्तबद्ध नियोजन करून कार्यक्रम सुरळीत पार पाडला.

धर्म आणि संस्कृती जपण्यासाठी अशा सप्ताहांचे महत्त्व अधोरेखित करत मान्यवरांनी ग्रामस्थांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल सर्व भालगाव ग्रामस्थांचे मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले.

## सायबर लुटारूंचा नवा फंडा:ग्राहकांची फसवणूक,रिप्लाय देतेवेळेस थोडा करा विचार

### गॅस कनेक्शन अपडेटच्या नावाने बँक खाते साफ; काळजी घ्या बरं

लोकनेता न्यूज नेटवर्क

**किनवट । शेख शौकत**





गॅस सिलिंडर टंचाईच्या काळात 'केवायसी' अपडेट करण्याच्या भूलथापा देऊन ग्राहकांची बँक खाती साफ करण्याचे काम सायबर गुन्हेगार करत आहेत. 'तुमचे गॅस कनेक्शन बंद होईल' किंवा 'सबसिडीसाठी तत्काळ अपडेट करा' असे मेसेज, लिंक्स आणि एपीके फाइल्स पाठवून बँक खात्यांवर डल्ला मारला जात आहे. असे प्रकार टाळण्यासाठी ग्राहकांना खबरदारी घ्यावी लागणार आहे.

या बहाण्यांनी होते नागरिकांची फसवणूक गॅस सिलिंडरचे बुकिंग करणे, केवायसी अपडेट करणे, खाते तपासणे, सबसिडी देण्याचे आमिष दाखवून नागरिकांची फसवणूक केली जात आहे. बनावट लिंक पाठवून त्यावर क्लिक करण्यास सांगितले जाते. या अशा प्रकाराला बळी पडून क्लिक करताच ग्राहकांचे बँक खाते साफ होते. नागरिकांनी १९३० या सायबर हेल्पलाईनवर कॉल करून मदत घ्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

आणि कधी आरटीओ चलान, तर कधी वीजबिलाची एपीके: एपीके मेसेजवर क्लिक करताच ग्राहकांच्या मोबाइलचा ताबा सायबर गुन्हेगारांकडे जातो. ताबा मिळविण्यासाठी ते आरटीओ चलान, वीज बिल, आधार केवायसी, बँक खाते अपडेट करणे, ऑनलाईन खरेदीत सवलतीचे एपीके मेसेज पाठवतात. मेसेजच्या शेवटी 'एपीके' असे शब्द दिसता.

गेल्या एक महिन्यापासून अमेरिका, इस्रायल आणि इराण या देशांतील युद्धामुळे पुरवठा साखळी खंडित झाल्याने देशात सर्वत्र गॅस सिलिंडरची टंचाई निर्माण झाली आहे. गॅस वितरण कंपन्यांच्या कार्यालयांसमोर पहाटेपासून रांगा लागत आहेत. घरपोच सिलिंडर यंत्रणाही वेळेत पोहोचत नाही. त्यामुळे नागरिक हतबल झाले आहेत

## पळसी येथील तंटामुक्ती अ.श्री संजीवरेड्डी च्या शेतां मध्ये माँ तुळजा भवानी येडेस्वरी माता प्रकट

### दोन एकर जमीन दान मंदिरासाठी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**मांडवी । डॉ.भारत उद्धव राठोड**

कणकी तांडा जवळ असलेला गाव पळशी येते एक सूंदर मंदिराची स्थापना करण्यात आली..आहे..

आणि कणकीफाटा जवळ पास संजीव रेड्डी च्या शेतामध्ये गुढीपाडव्याच्या दिवशी दि.१९मार्च २०२६ रोजी माँ येडेश्वरी प्रकट झाली असता

दोन एकर जमीन दान देऊन तेथे स्थापना करण्यात आली

आणि तीन मंदिराचे बांधकाम करण्यात येणार आहे अशी माहिती मंदिराची पुजारी माता वर्षा देवी नि सांगितले आहे

येडेश्वरी माता ची कथा व ज्ञानेश्वरी पारायणाचे आयोज रोज होत आहे


पळशी येथे अखंड हरिनाम सप्ताह व येडेश्वरी माते ची कथा आयोजन करण्यात येत आहे.

रोज सकाळी ९ ते ११ च्या दरम्यान किर्तन झाल्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम रोज देण्यात येत आहे.

रोज रात्री भजन कीर्तिन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येते, आजूबाजूचे गावाचे भक्त मंडळी ची खूप मोठी गर्दी माँ येडेश्वरी च्या दर्शना साठी दिसायला येत आहे..

या कार्यक्रमासाठी पळशी कणकी परिसरातील भावीक भक्तांनी उपस्थित राहून हरिनाम कीर्तनाचा व महाप्रदाचा लाभघेण्याचे आवाहन पळशी ग्रामस्थांनी केली आहे.





## हदगाव शहरात भ.महावीर जन्मकल्याणक महोत्सव साजरा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**हदगांव । चंद्रकांत भोरे**

शहरातील १००८ पार्श्वनाथ दिगंबर जैन मंदिरात भगवान महावीर जन्मकल्याण महोत्सव (महावीर जयंती) उत्साहात साजरी करण्यात आली.

ध्वजारोहणानंतर पूजा अभिषेक करून भगवान महावीरांच्या प्रतिमेची शहरातून भव्य मिरवणूक काढण्यात आली. भगवान महावीर की जय,जियो और जीने दो या घोषणांनी आसमंत दुमदुमून गेला होता.व्यापारी असोसिएशनचे अध्यक्ष कैलासचंद्र बलदवा, पंचशील विद्यालयाचे मुख्याध्यापक अनिल दस्तूरकर,पर्यवेक्षक एम. आर.बेळकुंदे आदींनी भगवान महावीरांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दर्शन घेतले.



मिरवणुकीमध्ये माजी नगरसेवक संजय रोकडे,मंदिराचे कोषाध्यक्ष संदीप अर्जुनराव ढोले,विलासराव संघई,मनोज लव्हांडे,प्रदिप संघई,नंदकुमार, संजय,प्रशांत,अमोल अतुल,चंद्रकांत,शरद संघई,सौ.दर्शना ढोले (सोनटक्के),सौ.समता रोकडे,सुनिता,प्रणिता, अर्पिता प्राजक्ता,स्वाती,विना,

संघई सह सर्व समाज भगीनी उपस्थित होत्या.मंदिराचे कोषाध्यक्ष संदीप ढोले सौ.दर्शना ढोले,श्रीमती सिंधूताई अर्जुनराव ढोले यांनी भगवान महावीरांच्या प्रतिमेचे पूजन करून दर्शन घेतले.मिरवणूक मंदिर परिसरात विसर्जित करण्यात आली या ठिकाणी सर्व जैनसमाज भगिनींनी घेरा धरून सुंदर नृत्य सादर केले.महावीर जन्म कल्याणक दिवस उत्साहात साजरा करण्यासाठी सर्व जैन समाजबांधवांनी परिश्रम घेतले.

महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सदस्य तथा पंचशील विद्यालयाचे सचिव सुनील सोनूले यांनी भगवान महावीर जन्मकल्याणक दिनानिमित्त समाज माध्यमावर जैनसमाज बांधवांना शुभेच्छा दिल्या.

## कल्याण कडेकर यांना मानद डॉक्टरेट प्रदान



लोकनेता न्यूज नेटवर्क

**भूम । रविंद्र लोमटे**

तालुक्यातील वंजारवाडी गावचे कर्तव्यदक्ष सुपूत्र कल्याण कडेकर यांना शिरूर तालुक्यातील स्वा से कै शंकरराव बाजीराव डावखरे विद्यालय पिंपळे खालसा हिवरे कुंभार येथील उपक्रमशिल गणित शिक्षक म्हणून फिलिपिन्स या देशातील Fundamental Baptist School of Theology ,Texas Baptist Bible College यांच्याकडून डॉक्टर ऑफ एज्युकेशन (DPed, Honoris Causa) ही प्रतिष्ठित मानद पदवी मेक्सिको, पाम्पांगा, फिलिपाइन्स येथे दिनांक २८ मार्च २०२६ प्रदान करण्यात आली आहे.

हा मानद सन्मान कल्याण रामा कडेकर यांच्या उत्कृष्ट शैक्षणिक कार्य, आदर्श व्यक्तिमत्त्व आणि शैक्षणिक विविधांगी प्राविण्याची दखल म्हणून प्रदान करण्यात आला आहे. तसेच कडेकर यांच्या जागतिक शैक्षणिक कार्याला अधिक बळकटी देत, त्यांना जहिळी Awards for Literature and the Arts 7 अंतर्गत, Poetry Planet Publishing House खपल. यांच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय शांतता शिक्षण डिप्लोमा (International Diploma in Peace Education) प्रदान करण्यात आला आहे. हा डिप्लोमा त्यांनी non-CHED Ecclesiastical झीसीरा यशस्वीरीत्या पूर्ण केला असून त्यांच्या शांतता , शिक्षण, जागतिक एकात्मता, नेतृत्व आणि शैक्षणिक उत्कृष्टता यांप्रती असलेल्या बांधिलकीची दखल घेण्यात आलीअसून त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यात.

तसेच YSFS - ILRAP, FBST - TBBC USA,ISS - BMAPI या संस्थेचे सन २०२६–२७ या वर्षासाठी आंतरराष्ट्रीय अधिकृत सदस्यत्वही कडेकर यांना प्रदान करण्यात आले आहे.

हे सदस्यत्व त्यांच्या जागतिक शैक्षणिक, संशोधन आणि शांतता उपक्रमांतील सक्रिय सहभागाचे प्रतीक आहे. यामधून त्यांच्या शिक्षण, आंतरशाखीय सहकार्य आणि आंतरराष्ट्रीय विकास क्षेत्रातील योगदानाची दखल घेतली गेली आहे. यासाठी मुंबई येथील युवा शास्त्रज्ञ डॉ प्रतीक मुणगेकर,मुंबइ©( FRSA, PhD,Martes Capilio Rimulata, DLitt) यांनी मार्गदर्शन केले.या सन्मानामुळे जगभरातील विद्यार्थी, शिक्षक , संशोधक

यांच्याबरोबर शैक्षणिक आंतरराष्ट्रीय देवाण–घेवाण करण्यास वाव मिळणार आहे .जगभरातील विद्यार्थ्यांबरोबर संवाद साधून तेथील शिक्षण पद्धतीचा अनुभव घेण्यास मदत मिळणार आहे.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ७४९९६१५९३३ .या अंकात प्रकाशित झालेल्या बातम्या व लेखा या मधून व्यक्त झालेल्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही (वाद विवाद गेवराई न्यायालयाअंतर्गत)

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 7499615933